# महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ

## फुटाळा तलाव मार्ग, नागपूर–01 (म.रा.)

दु. क्र. ९४२०१८३०१५ ई-मेल : deanle@mafsu.in

.................................................................................................................................................................

जा. क्र. मपमविवि/निशि/वि.प्र.फेरी/५६८ /२३ दिनांक. ०५/०९/२०२३

## सुचना परिपत्रक

### विशेष व व्यवस्थापन प्रवेश फेरी
### (Special & Management Round)

''पशुधन व्यवस्थापन व दुग्धोत्पादन'' पदविका अभ्यासक्रमाच्या ज्या पदविका विद्यालयामध्ये प्रथम वर्ष प्रवेशाच्या अंतिम फेरीनंतर रिक्त जागा राहिल्या आहेत/इतर कारणामुळे प्रवेश झाले नाही. त्या जागांवर गरजु विद्यार्थ्यांना प्रवेश मिळण्याच्या उद्देशान विद्यापीठाद्वारे एक विशेष बाब म्हणुन प्रवेश इच्छुक अर्जदारास प्रवेशाची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. प्रवेश वर्गवारीनुसार माहिती पुस्तिका-२०२३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे व फक्त गुणवत्तेच्या आधारावर रिक्त असलेल्या व व्यस्थापन कोट्यातील जागाकरिता राहील. प्रवेशाबाबत संकेतस्थळावरून संपुर्ण माहिती जाणुन घेण्याची जबाबदारी अर्जदाराची राहील. त्या करिता प्रवेश इच्छुक अर्जदाराने खालील सुचना/बाबी विचारात घ्याव्यात.

| | |
|---|---|
| १. | ज्या उमेदवाराने या पुर्वी प्रवेश अर्ज दाखल केलेले आहे, परंतु पात्रता असतांना काही कारणास्तव प्रवेश अर्ज रद्द झालेले आहे किंवा अर्जदाराने प्रवेश नाकारला आहे किंवा प्रवेश मिळाला नाही अशा उमेदवारांनी त्यांचे लॉगीन आयडी मधुन अपुर्ण असलेल्या अर्जाची/कागदपत्रांची पुर्तता करून अर्ज फेर सादर करावा. |
| २. | ज्या उमेदवारांनी यापुर्वी ऑनलाईन अर्ज दाखल केला नाही, अश्या उमेदवारांनी माहिती पुस्तिका २०२३-२४ मधील संपुर्ण सुचना वाचुन नव्याने ऑनलाईन शुल्क (Rs.300) व प्रवेश अर्ज सादर करावा. |
| ३. | सादर केलेला अर्ज शुल्क व प्रवेश अर्ज तपासणीत तात्पूरता अपात्र (Provisional Reject) झाल्यास, अर्जदाराने निर्धारीत तारखेला तक्रार शुल्क (Rs. 100) भरून, आपले अर्जात त्रूटींची पुर्तता/सुधारणा करण्याकरिता घटक महाविद्यालयात तक्रार समितीपुढे हजर राहुन आपला अर्ज फेर सादर करणे आवश्यक राहील. |
| ४. | वरिल पैकी ज्या उमेदवारांना, अर्ज ग्राहय झाल्याचा एस.एम.एस. येईल, त्याच उमेदवारांनी निश्चित दिनांक व वेळेस (दुपारी १२.०० पुर्वी) आपल्या ईच्छेच्या व जागा रिक्त असलेल्या पदविका विद्यालयामध्ये हजर राहणे आवश्यक आहे. |
| ५. | पदविका विद्यालयाच्या प्राचार्यांनी निश्चित केलेल्या दिनांक व वेळेवर हजर असलेल्या उमेदवारांचे शुल्क व मुळ प्रमाणपत्रांची पडताळणी करूनच वर्गवारीनुसार व सामान्य गुणवत्ता यादी तयार करावी. गुणवत्ता यादीतील उमेदवारांना प्रथम त्यांचे वर्गवारीनुसार व त्यानंतर गुणवत्तेनुसारच रिक्त असलेल्या जागेवर प्रवेश दयावा. |
| ६. | अर्जदाराच्या लॉगीनमध्ये निर्धारीत दिनांकाला ओटीपी दिल्या जाईल. प्राचार्याने सदर ओटीपी घेऊन विद्यालयाच्या लॉगीनमध्ये भरून प्रवेश निश्चित करावा. त्यानंतर विद्यालयाच्या लॉगीन मध्ये प्रोव्हीजनल प्रवेश पत्र उपलब्ध होईल. |
| ७. | प्रत्यक्ष प्रवेश घ्यायच्या वेळेवर उपस्थित झाले नाही किंवा रिक्त जागा भरल्या गेल्यास अर्जदारास प्रवेश मिळणार नाही. अर्जदार प्रवेशाच्यावेळेस मुळ प्रमाणपत्रे सादर करू शकला नाही किंवा अर्जातील माहिती/प्रमाणपत्रे खोटी असल्याचे निदर्शनात आल्यास कोणत्याही वेळेस प्रवेश रद्द केला जाईल. |

# विशेष व व्यवस्थापन प्रवेश फेरीचे वेळापत्रक
## (Special & Management Round)

| अं. क्र. | विवरण | दिनांक |
|---|---|---|
| १ | प्रवेशाकरिता लॉगीन करून शुल्क व अर्ज सादर करणे किंवा सुधारणा/दुरूस्ती करून फेर सादर करणे. | ०७/०९/२०२३ ते ११/०९/२०२३ |
| २ | प्रवेश अर्ज/प्रमाणपत्रे व शुल्क तपासणे. | ०७/०९/२०२३ ते १२/०९/२०२३ |
| ३ | तात्पुरती स्विकृत व अस्विकृत अजाची यादी जाहीर करणे. | १३/०९/२०२३ |
| ४ | प्रवेश अर्ज सुधारणेकरिता घटक महाविद्यालयात जावुन तक्रार शुल्क (Grievance Fee) भरून अर्ज फेर सादर करणे. | १४/०९/२०२३ ते १५/०९/२०२३ सकाळी १०:०० ते सायं. ०६:०० पर्यंत |
| ५ | अंतिम स्विकृत व अस्विकृत अर्जाची यादी जाहीर करणे. | १६/०९/२०२३ |
| ६ | स्विकृत अर्जदाराने जागा रिक्त असलेल्या व त्याचे इच्छेच्या पदविका विद्यालयामध्ये दु. १२.०० पूर्वी प्रत्यक्ष हजर राहणे, | १८/०९/२०२३ दुपारी ११.०० ते सायं. ०६:०० पर्यंत |
| ७ | प्राचार्याने प्रवेशाकरीत स्विकृत झालेल्या उमेदवाराची वर्गवारीनुसार व गुणवत्तेनुसार यादी तयार करणे, अर्जदाराचा ओटीपी घेऊन प्रवेश निश्चित करणे. प्रवेशीत विद्यार्थ्याला प्रोव्हिजनल प्रवेश पत्र देणे. | १८/०९/२०२३ दुपारी १२.०० ते सायं. ०६:०० पर्यंत |
| ८ | व्यवस्थापन कोटयाकरिता पदविका विद्यालयात विहीत शुल्क व मुळ प्रमाणपत्रासह जाऊन प्राचार्यांना ओटीपी देणे, प्रवेश पुष्टीकरण करणे. | २०/०९/२०२३ (नियमीत प्रवेशाच्या वेळापत्रकाप्रमाणे) |

.अधिष्ठाता नि.शि.
मपमविवि, नागपूर